

चिकोडी : सायबर प्रशिक्षणामध्ये सहभागी झालेले निडसोशीतील विद्यार्थी.

# निडसोशीतील विद्यार्थ्यांचा सायबर प्रशिक्षणात सहभाग

**संकेश्वर :** निडसोशी येथील एसजेपीएन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चिकोडी येथे बी. के. कॉलेजमध्ये पार पडलेल्या सायबर प्रशिक्षणामध्ये सहभाग दर्शविला. डिजिटल युगात सायबर गुन्हे आणि सुरक्षितता याबाबत माहिती जाणून घेतली. प्रशिक्षणातून सायबर सुरक्षेचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, पासवर्ड, व्यवस्थापन, ऑनलाईन फसवणुकीची ओळख व सायबर कायदाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना संवादात्मक पद्धतीने जागरूक करून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. यावेळी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.